**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक. ६७/२०२१.</u>**
**<u>नि.क्र.४६.</u>**

**<u>वादी क्र.१ तर्फे साक्षीदार क्र. ०१ किसन कारभारी खेमनर यांचा पुढील सरतपास विधीज्ञ श्री. एस. एम. दिक्षीत यांचेमार्फत शपथेवर सुरु :-</u>**

**०१.** सदरच्या प्रकरणांत मी पुरावाकामी प्रतिज्ञालेख दाखल केला असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो **<u>नि.क्र. ४६</u>** वर आहे. तसेच, सदर प्रकरणात मी दस्त यादी नि.क्र.०३ खाली गट क्रमांक ५१९ चा ७/१२ उतारा दाखल केला असुन त्यास **<u>नि. क्र.४७</u>** देण्यात येते. तसेच, सदर प्रकरणात मी फेरफार क्रमांक ९४३३ दाखल केला असुन तो **<u>नि.क्र.४८</u>** वर आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १ तर्फे विधीज्ञ श्रीमती जे. पी. मालपाणी यांच्या मार्फत सुरुः-</u>**

**०२.** माझे शिक्षण इयता सहावी पर्यंत झाले आहे. मला थोडेफार वाचता लिहीता येते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांना एकुण सहा भाउ होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ पोपट चे वडिल एकनाथ हे माझ्या वडिलांचे सर्वात छोटे भाउ होते. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीसंदर्भात वाटपाचा दावा क्रमांक ५४७/१९९० यापुर्वी दाखल झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत व इतर वडिलोपार्जित मिळकतींचे माझे वडिल व त्यांच्या भावांमध्ये वाटप झाले होते. हे मला माहित नाही की, दिवाणी दावा क्रमांक ५४७/१९९० च्या निकालावरून दरखास्त क्रमांक १५/२००७ दाखल झाली व त्यानुसार तहसिलदार यांच्याकडुन वाटप झाले. हे म्हणणे खरे आहे की, त्या वाटपात सर्व भावांना प्रत्येकी अंदाजे ९ ते १० एकर जमिन मिळाली. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये ४३ आर+५ आर पोट खराबा क्षेत्र माझ्या हिश्याला आले असुन उर्वरीत ०.२७ आर+३ आर पोट खराबा क्षेत्र प्रतिवादी क्र.१ च्या हिश्याला आले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाटप झाल्यापासुन जो तो ज्याची त्याची जमिन वहिती करतो. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये विहीर नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ५७९ मध्ये विहीर आहे. गट क्रमांक ४९९/१ मध्ये विहीर आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ पोपट ने त्याचे दावा मिळकतीमधील २७ आर क्षेत्रात उसाचे पिक घेतले आहे व त्याची नोंद कारखान्यात केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, उस लावली त्यावेळी कारखान्याचा माणुस येवुन बघतो व त्याची नोंद करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या दावा मिळकतीमधील क्षेत्रात उस लावला नाही त्यामुळे, उसाची नोंद केली नाही. सन २०२०-२१ साली माझे दावा मिळकतीमधील ४३ आर क्षेत्रात उसाची लागवड केली हे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ५१९ मधील पुर्वेकडील क्षेत्र माझे

आहे व पश्चीमेकडील क्षेत्र प्रतिवादी क्र.१ चे आहे. माझ्या क्षेत्रातील उसाची नोंद कारखान्याला झाली नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्रमांक १ चा किती उस कारखान्याला गेला हे मी माझ्या पुराव्याकामी प्रतिज्ञालेखात सांगितलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्रमांक १ चा पंचवीस टन उस कारखान्याला दिला व त्याला त्याचा मोबदला देखील मिळाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या क्षेत्रात उस लावलाच नाही व त्यामुळे माझा उस कारखान्यात गेला नाही व त्यामुळे मला कारखान्याकडून मोबदला मिळण्याचा प्रश्न उद्भवत नाही. मी उसाचे पैसे मीळाले नाही म्हणून अद्याप पर्यंत कारखान्याला नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुराव्याकामी प्रतिज्ञालेखात ''प्रतिवादी क्रमांक १ ने उसाचा संपूर्ण मोबदला घ ेतला आहे'' असे खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नेहमी प्रतिवादी क्रमांक १ विरुदध खोटे नाटे आरोप करुन भांडन-तंटा करतो. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादी क्रमांक १ विरुद्ध फौजदारी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी जमीन पडीक असून मी काल्पनीक रचना करुन हा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दाव्यातील मागणी कायदेशीर नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

**प्रतिवादी क्रमांक २ ते ५ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. त्यामुळे उलटतपास काहीही नाही.**

**प्रतिवादी क्रमांक ६ व त्यांचे वकील श्री. खरे यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. त्यामुळे उलटपास काहीही नाही.**

**सा.वा.दा.ब.अ.क.के.**

**श्रवणोत्तर स्विकृती**

JOSHI PRASAD BALKRISHNA
Digitally signed by JOSHI PRASAD BALKRISHNA
Date: 2026.01.22 17:32:16 +0530

JOSHI PRASAD BALKRISHNA
Digitally signed by JOSHI PRASAD BALKRISHNA
Date: 2026.01.22 17:32:12 +0530

**दिवाणी न्यायाधीश व.स्तर, संगमनेर.**
**दि. २२/०१/२०२६.**

**( प्रसाद बा. जोशी )**
**५ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, संगमनेर.**